अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# विशेष दर्जाची मागणी की राजकीय ब्लॅकमेलिंग

अनेक राज्यांचे मुख्यमंत्री केंद्र सरकारकडे आपल्या राज्याला विशेष दर्जा मिळावा अशी मागणी करीत आहेत. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर बिजू जनता दलाचे नवीन पटनायक, छत्तीसगढचे मुख्यमंत्री रमण सिंग आणि यापूर्वीच बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी बिहारला अशीच वेगळी आणि स्वतंत्र वागणूक मिळावी म्हणून मागणी केली होती. कॉंग्रेसने त्याचा राजकीय लाभ घेऊन त्यांच्या मागणीचे समर्थनही केले होते. परंतु आपल्या संविधानाने सगळ्या राज्यांना समान अशी व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. फक्त जम्मू काश्मिरचा अपवाद वगळला तर कोणत्याही राज्याला वेगळी वागणूक मिळेल अशी कोणतीही तरतूद केली नाही. भाषिक स्तरावर प्रांतरचना होताना त्याचा भौगोलिक विचार केला गेला होता. त्या त्या राज्याची आर्थिक व्यवस्था कायम राहील यासाठी आपापले महसूली उत्पन्न वाढवण्याचे सर्वप्रकारचे अधिकार राज्यांना दिले गेले आहेत. परंतु अलीकडे मात्र पुन्हा एकदा काही राज्यांचे मुख्यमंत्री विशेष दर्जा मिळावा म्हणून पाठपुरावा करताना दिसतात. हा विशेष दर्जा म्हणजे आहे तरी काय याचा केंद्र सरकारने जाहीरपणे खुलासा केला पाहिजे. केवळ केंद्राकडून अब्जावधी रुपयाचे पॅकेज मिळवण्याकरता जर ही खेळी खेळली जात असेल तर हा विशेष दर्जा प्रकार म्हणजे राजकीय ब्लॅकमेलिंगच म्हणायला हवे.आपली राज्ये आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करणे ही तिथल्या मुख्यमंत्र्यांची नुसती जबाबदारी ठरत नाही तर त्यांनी आपले राजकीय कौशल्यदेखील वापरले पाहिजे. विकासाची अनेक साधने उपलब्ध असतात. त्या राज्यांमध्येच नैसर्गिकदृष्ट्या साधन संपत्तीसुध्दा उपलब्ध असते. परंतु त्याचा पूर्ण क्षमतेने वापर केला जात नाही. राज्य सरकार त्यासाठी योजना तयार करीत नाही. किंवा आधुनिक पध्दतीने आपल्या राज्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करून आपले राज्य विकसित करण्याची इच्छाशक्तीही दाखवली जात नाही. ज्या राज्यांमधून लोकांनी या मुख्यमंत्र्यांना दोन दोन तीन तीन वेळा निवडून दिले तेच मुख्यमंत्री विशेष दर्जाची किंवा केंद्राच्या अधिक सहाय्याची मागणी करतात हेही एक आश्चर्य ठरते. कदाचित ही गोष्ट खरी असेल की राज्याच्या विकासाच्या योजना आणि केंद्राकडून अपेक्षित असलेले अर्थसहाय्य या राज्यांमध्ये मिळू शकत नसेल तर त्याची पूर्तता केंद्राकडून करून घेतली पाहिजे. ती होत नाही म्हणून विशेष दर्जा मागण्याची ही पध्दत अनावश्यकच म्हणायला हवी.

## आर्थिक लाभांसाठी मागणी

विकासाचे सूत्र राबवताना काही एक मार्गदर्शक सूत्रे तयार करण्याची गरज आहे. यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घ्यायला हवा. राज्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या गरजा समजावून घेतल्या पाहिजेत. किंवा त्यासाठी लागणारा पैसा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी केंद्राने पार पाडली पाहिजे. एकीकडे राज्यांची स्वायत्तता अबाधित राहिली पाहिजे. अशी मागणी केली जाते आणि दुसरीकडे केंद्र सरकारकडून राज्यांच्या महसूली उत्पन्नापेक्षाही अधिक पैशाची मागणी केली जाते. हा परस्परविरोध म्हटला पाहिजे. विशेष दर्जाची मागणी करण्याचे हे फॅड जम्मू काश्मिरपासूनच सुरू झाले. त्या ठिकाणची भौगोलिक परिस्थिती आणि या राज्याची स्वायत्तता टिकवण्याकरता अगदी १९४७ साली ज्या घाईघाईने काही निर्णय घेतले गेले त्यातून काश्मिरला विशेष दर्जा दिला गेला. आज साठ वर्षानंतर तीच परिस्थिती कायम राहिलेली नाही. त्यावेळी काश्मिरला दिला गेलेला विशेष दर्जा एक परिस्थितीजन्य गरज होती. आज त्या परिस्थितीत मूलभूत फरक पडलेला आहे. मग तेथील पर्यटनासारखा सर्वाधिक उत्पन्न देणारा उद्योग असेल किंवा स्थानिक स्वरुपाची शेती असेल. तिथल्या अनेक प्रकारच्या आर्थिक स्त्रोतांचा परिणामकारक वापर केला गेला. आणि तशी राज्ये विकसित करण्याची इच्छाशक्ती मुख्यमंत्र्यांनी दाखवली तर आजदेखील काश्मिरला विशेष दर्जाची कोणतीही गरज नाही. फक्त देशातील काही राज्ये अशी आहेत की, त्याठिकाणी बाहेरच्या प्रांतातील लोकांना जमीन खरेदी करता येत नाही. परंतु देशाच्या एकात्म भावनेचा जर विचार केला आणि आर्थिक उत्पन्न वाढीचे ध्येय ठेवले तर ही अटसुद्धा काहीवेळा अनाठायी वाटायला लागते आणि इतर राज्यांवर अन्याय करणारीही ठरते. विशेष दर्जाच्या मागणीचा प्रामुख्याने संबंध ज्यादा पैसा मिळावा याच्याशीच असतो.तो पैसा वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून केंद्राकडून मिळवता येईल. केंद्र सरकारही तो देऊ शकेल त्यासाठी विशेष दर्जा मिळावा अशी मागणी करण्याची कोणतीच गरज दिसत नाही. सध्यातरी राजकीय हितसंबंध जपण्याकरता आणि राज्याच्या विकासाची जबाबदारी टाळण्याकरता हा प्रकार केला जातो की काय असे वाटायला लागते. आतादेखील रमणसिंग यांनी छत्तीसगढच्या नक्षलग्रस्त पाच सहा जिल्ह्यांचा उल्लेख करून राज्याच्या विशेष दर्जाची मागणी केली आहे. परंतु नक्षलवादाविरुद्ध लढण्याकरता केंद्र आणि राज्य सरकारने संयुक्तपणे प्रयत्न केले तर त्याचादेखील परिणाम दिसून येईल. सुरक्षिततेशी संबंधित मागणीला केंद्र सरकारने मात्र भरघोस अर्थसहाय्य केले पाहिजे, कारण नक्षलवाद किंवा दहशतवाद रोखण्याकरता एकटे राज्यसरकार पुरे पडू शकत नाही.

## राज्यांचा विकास मुख्यमंत्र्यांची जबाबदारी

यापूर्वीसुध्दा राज्यांच्या या मागणीचा विचार करण्याकरता 'सरकारीया कमिशन' नेमले गेले होते. त्यातल्या अनेक मुद्दांबाबत अनेक राज्यांची तक्रारही होती. प्रामुख्याने राज्यांच्या स्वायत्ततेमध्ये हस्तक्षेप होता कामा नये, असे या राज्यांचे म्हणणे होते. परंतु केंद्राने ठरावीक योजनांसाठी अधिकाधिक अर्थसहाय्य देण्याची गरज सरकारीया कमिशनच्या शिफारशींमध्ये आहे. त्या शिफारशींनाही आता जवळजवळ तीस वर्षांचा कालावधी उलटून गेला. आता नव्याने राज्य सरकारांच्या आर्थिक मागण्यांचा विचार करण्याची वेळ आली आहे. केवळ राजकीय दबाव वापरून पैसे पदरात पाडून घेण्याची वृत्ती थांबली पाहिजे. आतापर्यंत काश्मिर, बिहार आणि उत्तरप्रदेश या राज्यांनी असे आर्थिक पॅकेज मिळवून घेतले. आता ओरिसा छत्तीसगढ एवढेच नव्हे तर उत्तरप्रदेशनेसुध्दा यासाठी दबाव निर्माण करायला सुरुवात केलेली दिसते. राज्यांच्या विकासाची जबाबदारी ही प्रामुख्याने राज्यसरकारांचीच आहे. काही ठरावीक आणि विशिष्ट योजनांबाबत केंद्र सरकार ज्यादा अर्थसहाय्य निश्चितपणे देऊ शकते. मात्र याऐवजी विशेष दर्जा असा शब्द वापरून आपले महत्त्व वाढवण्याचा प्रयत्न काही राज्ये करताना दिसतात. खरे तर कोणत्याही आर्थिक मदतीशिवाय आपले राज्य स्वयंपूर्ण आणि विकसित करण्याचा ध्यास तिथल्या मुख्यमंत्र्यांनी घेतला पाहिजे.